# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400001.

दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.

E-mail : :desk 10@dtemaharashtra.gov.in webside : www.dtemaharashtra.gov.in


जा.क्र.१०/एनजीपी/२०१७/माहितीअधिकार/२४/३१९९

दिनांक: - 9 MAR 2017

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय : विविध विषयांच्या प्राप्त होणा-या तक्रारींबाबत....

संदर्भ : शासन उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय,मुंबई, दि.०५ जानेवारी २०१७चे आदेश

उपरोक्त संदर्भाधिन विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, अपिलार्थी श्रीमती निशा रमेश बावनेर यांनी मुच्छाला तंत्रनिकेतन, ठाणे यांच्याकडून त्यांना होणा-या त्रासाबाबत त्यांनी केलेल्या तक्रार अर्जावर कोणती कार्यवाही केली याबाबत शासनाकडे क्र.६५/२०१६ नुसार अपिल दाखल केले होते. सदर अपिलाची सुनावणी दि.५/१/२०१७ रोजी आयोजित करून दि.९/१/२०१७ अन्वये अपिल आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे.

सदर अपिलाचे अनुषंगाने सुनावणीमध्ये शासन स्तरावरून असे आदेश देण्यात आलेले आहेत की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली बाब ही माहिती अधिकाराच्या कक्षेत येत नाही. परंतु अपिलार्थी ही महिला असल्याने व त्यांचे तक्रारीचे गांर्भिय लक्षात घेऊन छळवणूकी संदर्भात शासनाच्या महिला सक्षमीकरण धोरणाच्या अनुषंगाने त्यांनी योग्य मार्गाने प्रथम संबंधित संस्थेमधील महिला तक्रार निवारण समितीकडे दाद मागणे, त्यांनी दाद न दिल्यास स्थानिक पोलिस स्थानक, मानवी हक्क आयोग, महिला आयोग, शाळा न्यायाधिकरण यांचेकडे देखील दाद मागण्याची मुभा असल्याचे निदर्शनास आणून दिले. तसेच अशा विविध प्रकारच्या तक्रारीवर तात्काळ कार्यवाही करण्याबाबत व निर्णय घेण्याबाबत तसेच शासनाच्या महिला सक्षमीकरण धोरणाच्या अनुषंगाने शासनाने निर्गमित केलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबतच्या सूचना सर्व सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय व शैक्षणिक संस्थाना संचालनालयाच्या स्तरावरुन देण्याबाबत हि आदेशित केले आहे.

तरी आपणांस कळविण्यात येते की, आपले विभागातंर्गत असलेल्या पदविका अभ्यासक्रमाचे संस्थांना वर नमद केल्यानसार उचित कार्यवाही करण्याबाबत आपले स्तरावरून कळविण्यात यावे.

पृष्ठांकन/तशिस/विकाना/शैवि/महिला तक्रार/2017/734

दिनांक:- 20 MAR 2017

प्रति,

प्राचार्य,सर्व पदवीका संस्था,

नागपूर विभाग,

नागपूर.

उपरोक्त पत्रात नमुद केल्या प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर

स्पीड पोस्टाने.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिल

अपिल क्र. ६५/२०१६

दिनांक : ०५ जानेवारी, २०१७

तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई
नोंदणी क्र. २४
दिनांक ९-१-१७
कार्यासन क्र. १०

श्रीमती निशा रमेश बावनेर, : अपिलार्थी
गौरी निवास, प्रीती पार्क जवळ,
ओवळा, घोडबंदर रोड, ठाणे-पश्चिम.

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (तांशि-७), : विरुध्द पक्षकार
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
जन माहिती अधिकारी, तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पत्र प्राप्त झाले
7 JAN 2017
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई १.

उपरोक्त विषयाबाबत अपिलार्थी यांचा दिनांक १७-१२-२०१६ रोजीचा जन माहिती अधिकारी,मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे कार्यालयाकडे दाखल केलेला प्रथम अपिल अर्ज मला विभागाच्या नोंदणी शाखेमार्फत दिनांक २१-१२-२०१६ रोजी प्राप्त झाला.

२. उपरोक्त प्रथम अपिल अर्जाच्या अनुषंगाने माझे मंत्रालयीन दालन क्र. ४४१ (विस्तार), मंत्रालय, मुंबई येथे दिनांक ०५-०१-२०१७ रोजी दुपारी ४-०० वा. सुनावणी आयोजित करण्यात आल्याचे अपिलार्थी यांना दिनांक २२-१२-२०१६ रोजीच्या नोटीशीन्वये कळविण्यात आले होते. सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, तांशि-७, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे कागदपत्रांसह उपस्थित होते. अपिलार्थी स्वत: सुनावणीस उपस्थित होत्या.

३. सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी "मुच्छाला तंत्रनिकेतन, ठाणे यांचेकडून त्यांना होणा-या त्रासाबाबत त्यांनी केलेल्या तक्रार अर्जावर कार्यवाही काय केली" याबाबत विचारणा केली.

४. सुनावणी दरम्यान, जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, तांशि-७, मंत्रालय, मुंबई यांनी कागदपत्रांच्या आधारे अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अर्जांतर्गत केलेल्या अर्जाची प्रत माअअ-१२१६/प्रक्र-६९/१६/तांशि-७, दिनांक १ डिसेंबर, २०१६ रोजी तंत्रशिक्षण संचालनालयास पुढील कार्यवाही करण्याच्या सुचनेसह पाठविण्यात आल्याचे निदर्शनास आणुन दिले.

५. सुनावणी दरम्यान जन माहिती तथा सहाय्यक संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांनी असे निदर्शनास आणुन दिले की, श्रीमती निशा बावनेर यांच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने संचालनालयाकडून सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांचेकडून पत्र क्र. १०/एनजीपी/तक्रार/२०१६/२०६५९, दिनांक २४-११-२०१६ अन्वये स्पयंस्पष्ट अहवाल मागविण्यात

आला असुन तो अदयापि संचालनालयाकडे प्राप्त झालेला नाही. परंतु संचालनालयाच्या पत्राच्या अनुषंगाने सहसंचालक, विभागीय कार्यालय, मुंबई यांनी त्यांच्या पत्र क्र. ४/विकामुं/तंशि/तांत्रिक-१/२०१६/३४८४, दिनांक ३ नोव्हेंबर, २०१६ नुसार संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना पत्र लिहून श्रीमती बावनेर यांच्याबाबत संस्थेकडून वस्तुस्थिचा अहवाल मागविण्यात आल्याचेही जन माहिती अधिकारी यांनी निदर्शनास आणुन दिले.

६. वास्तविक पहाता अपिलार्थी यांनी माहिती अधिकारांतर्गत विशिष्ट कागदपत्रांची अथवा दस्तऐवजांची मागणी करणे तथा मागितलेली उपलब्ध कागदपत्र अपिलार्थी यांना देणे अपेक्षित आहे. परंतु अपिलार्थी यांनी त्यांची संस्थेकडून छळवणूक होत असल्याचे निवेदन करुन संस्थेविरुध्द कार्यवाही तातडीने करावी, चौकशी समिती नेमून संस्थेमध्ये पाठविण्यात यावी अशा प्रकारे मागणी केली.

७. अपिलार्थी यांनी मागणी केलेली बाब ही माहिती अधिकारांतर्गत कक्षेतील बाब नसल्याचे अपिलार्थी यांच्या निदर्शनास आणुन देण्यात आले. परंतु, अपिलार्थी महिला असल्याने व त्यांचे तक्रारीचे गांभिर्य लक्षात घेवुन माहिती अधिकाराच्या कार्यकक्षेत येत नसतानाही त्यांना होणा-या छळवणूकीसंदर्भात शासनाच्या महिला सक्षमीकरण धोरणाच्या अनुषंगाने त्यांनी योग्य मार्गाने प्रथम संबंधित संस्थेमधील महिला तक्रार निवारण समितीकडे दाद मागणे, त्यांनी दाद न दिल्यास स्थानिक पोलिस स्थानक, मानवी हक्क आयोग, महिला आयोग, शाळा न्यायाधिकरण यांचेकडे देखिल दाद मागण्याची मुभा असल्याचे अपिलार्थींच्या निदर्शनास आणून दिले. तसेच सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना अशा विविध प्रकारच्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करण्याबाबत व निर्णय घेण्याबाबत तसेच शासनाच्या महिला सक्षमीकरण धोरणाच्या अनुषंगाने शासनाने निर्गमित केलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबतच्या सूचना सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये व शैक्षणिक संस्थांना संचालनालयाच्या स्तरावरुन निर्गमित करण्याचे व आवश्यकतेनुसार योग्य ती कार्यवाही करण्याच्याही सूचना दिल्या.

उपरोक्त बाबी विचारात घेता खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

( डॉ. किरण पाटील )
प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव (तंत्रशिक्षण)